माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१६६५**

**अपिलार्थी श्री. दिपक रजपालसिंह ठाकूर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई- ४०० ०३०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय-१)**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
५ वा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई- ४०० ०३०

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०१.२०२४ | २०.०२.२०२४ | २६.०२.२०२४ | १९.०३.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०६.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय दिला असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.०२.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १९.०३.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १५.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"दिपक राजपालसिंह ठाकूर यांना प्रथमतः आरोपी करुन अभियोग दाखल करण्यासाठी उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय बुलढाणा यांनी आपल्या कार्यालयात दाखल केलेल्या प्रस्तावाची व त्या प्रस्तावावर आपल्या कार्यालयाने तयार केलेल्या कार्यालयीन टिपणीच्या व त्यासंबंधाने उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बुलढाणा यांचे कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रती देण्यात याव्यात ही विनंती. सहपत्रासहीत."*

जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०२.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, अर्जदार यांचे दि.१५.०१.२०२४ रोजीच्या अर्जात नमूद केलेले प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याने, अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१) (ज) व (छ) अन्वये नाकारण्यात येत आहे.

अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६.०२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०३.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे अधिवक्ता व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. १६.१०.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अर्जदार यांचे दि. १५.०१.२०२४ रोजीच्या माहितीचा अधिकार अर्जास अनुसरुन जा.क्र. मा.अ. ५१/२०२४/१९८३, दि. २०.०२.२०२४ अन्वये सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे माहिती अधिकार कायदा २००५ चे कलम ५(४) अन्वये सहाय्य घेवून त्यांचेकडून प्राप्त माहिती शासकीय नोंदणीकृत टपालाने माहिती पुरविण्यात आली होती. अर्जदारास पुरविण्यात आलेल्या माहितीने व्यथित झाल्याने दि. २६.०२.२०२४ रोजी प्रथम अपिल दाखल केले. त्या अनुषंगाने दि. १९.०३.२०२४ रोजी प्रथम अपिल सुनावणी असल्याबाबत पत्र देण्यात आले. परंतू अपिलार्थी यांचे पत्रावर नजरचुकीने दिनांक नमूद करण्याचे राहून गेले होते. अर्जदार यांना प्रथम अपिल सुनावणी दि. ०३.२०२४ रोजी १२.०० वाजता ठेवली असल्याबाबत या कार्यालयाचे जा.क्र.मा.अ. प्रथम अपिल/१२/२०२४/२६१९, दि. ०५.०३.२०२४ रोजीच्या पत्रात नजरचुकीने दिनांक नमूद केला नसल्याने अपिलार्थी यांनी या कार्यालयास संपर्क करुन सांगितले. त्याअनुषंगाने अपिलाथर्थी यांना प्रथम अपिलाची संधी देवून दि. ११.०७.२०२४ रोजी प्रथम अपिल सुनावणी असल्याबाबत त्यांचे ईमेल thakurdipak९३०@gmail.com द्वारे कळविण्यात आले होते. अर्जदार यांनी वेळोवेळी केलेल्या विनंतीनुसार त्यांना दि. २०.०८.२०२४ व दि. ०७.१०.२०२४ अशा प्रथम अपिल सुनावणी दिनांक देण्यात आल्या होत्या. दि. ०७.१०.२०२४ रोजीची सुनावणीकामी अर्जदार स्वतः हजर न रहाता त्यांनी त्यांचे प्रतिनिधी श्री. गजानन बुडकुले यांना लेखी निवेदनासह पाठविले होते. नमूद सुनावणी दरम्यान अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याचे आदेश देवून प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात आले होते. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री गजानन मनोहर बुडकुले यांना अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, अमरावती यांचे कडून प्राप्त करुन दि. ०८.०५.२०१४ व दि. ३१.०५.२०१४ रोजीचे ला.प्र. विभागामार्फत प्रस्तुत प्रकरणातील आलोसे यांचे सक्षम अधिकारी मा. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी सादर केलेल्या सक्षम मंजुरी अहवालाची प्रत पुरविण्यात येवून प्रती मिळल्यावावत श्री. गजानन बुडकुले यांची दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात आली

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना दि. ०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती प्राप्त झालेली आहे. परंतु त्यांना अधिकची माहिती अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीनी जुन २०१२ ते डिसेंबर २०१५ पर्यंत असा कालावधी नमुद करुन माहिती विचारलेली होती व त्याअनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २०.१०.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**